# प्रेस नोट. दि. २८/०१/२०२५.

## पी.एन.जी ज्वेलर्समध्ये चोरी करणारा, गुन्हेगार अटकेत, त्याचेकडून ७१.५ ग्रॅम सोने, १ किलो चांदी असा ६,८७,०००/- (सहा लाख सत्त्याऐंशी हजार/-) रुपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत.

## सोलापूर शहर गुन्हे शाखेची कामगिरी.

दि. २३/०१/२०२५ रोजी सायंकाळी ०७:३० वा.चे सुमारास पु.ना.गाडगीळ ज्वेलर्स, ध्रुव हॉटेल समोर, पटवर्धन चौक, सोलापूर या नव्याने सुरु झालेल्या, सुवर्णपेढी मध्ये काम करणारा सुपरवायझर, नामे राजकुमार बिराजदार याने सुवर्णपेढीतुन ७१.५ ग्रॅम सोने व एक किलो चांदी, असा एकुण ६,८७०००/- रु. किंमतीचा ऐवज, पेढीमध्ये कोणालाही न सांगता, ग्राहकांची बनावट नावाने बुकिंग करुन, कंपनीची फसवणुक करुन, चोरुन नेले आहेत वगैरे मजकुराची फिर्याद, पु.ना. गाडगीळ ज्वेलर्सचे मॅनेंजर श्री. राहुल नरेश बाकळे यांनी दिली. सदर घटनेबाबत सदर बझार पोलीस स्टेशन सोलापूर शहर येथे गुन्हा रजि नं. ६३/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३१८(४), ३०६ प्रमाणे दि. २४/०१/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सपोनि शैलेश खेडकर व त्यांचे पथकातील अंमलदार यांनी सदरचा गुन्हा करणारे इसमाबाबत, अत्यंत कमी कालावधीत, कौशल्याने, गोपनीयरित्या माहिती काढली. सुपरवायझर आरोपी नामे राजकुमार बापूराव बिराजदार वय-३५ वर्षे, रा. घर नं. १०८, हत्तुरे वस्ती, मजरेवाडी, स्वामी विवेकानंद नगर, सोलापूर विमानतळा समोर, सोलापूर यास दि.२४/०१/२०२५ रोजीच सायंकाळचे सुमारास, तो चोरी केलेला ऐवज विक्री करण्यासाठी जात असताना, सापळा लावून त्यास ताब्यात घेतले. त्याचे अंगझडतीत, त्याने पु.ना.गाडगीळ या दुकानातुन चोरलेले ७१.५ ग्रॅम सोने (एकुण १३ नग, पिळयाच्या अंगठया) व एक किलो चांदीचा बार (पी.एन.जी असा मार्क असलेले) असा एकुण ६,८७०००/-रु. किंमतीचा ऐवज सविस्तर पंचनाम्याने हस्तगत केला व सदरचा गुन्हा दाखल झाल्यापासुन १२ तासाचे आत उघडकीस आणला.

तसेच सोलापूरचे माजी महापौर स्वर्गीय श्री. महेश विष्णुपंत कोठे यांचे निधन झाल्याने, दि.१५/०१/२०२५ रोजी त्यांचे पार्थिव शरिर अंत्यदर्शनासाठी संभाजीराव शिंदे प्रशाला, विडी घरकुल सोलापूर येथील शाळेतच्या मैदानात ठेवण्यात आले होते. सदर ठिकाणी मोठया प्रमाणात लोक जमल्याने गर्दी झाली होती. सदर गर्दीचा फायदा घेवून मोबाईल चोरी करणारे, दोन इसमांबाबत, सपोनि शैलेश खेडकर यांचे पथकातील अंमलदार विनोद रजपुत यांना बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती, सदर बातमी बाबत खात्री करुन, सपोनि शैलेश खेडकर व पथकाने दि.१७/०१/२०२५ रोजी रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार नामे (१) महंमद इब्राहिम महंमद बागवान वय-२८ वर्षे, मुळ रा. बुनकर कॉलनी, बसवकलयाण, जि. बिदर, राज्य-कर्नाटक सध्या रा. मिसगोरी, नया मोहल्ला, मस्जिद जवळ, गुलबर्गा राज्य कर्नाटक (२) महंमद रफिक महंमद इस्माईल सय्यद वय-२८ वर्षे, मुळ रा. घर नं. २११, आळंद रोड, अर्शिया कॉलनी जाफराबाद, गुलबर्गा कर्नाटक सध्या रा. अलन चेक पोस्ट, आसरा क्वार्टर्स, तोलाबाशा दर्गा, गुलबर्गा राज्य कर्नाटक या आंतरराज्यीय गुन्हेगारांना सापळा लावून ताब्यात घेतले. पथकास त्यांचे ताब्यात, त्यांनी गडडा यात्रा मैदानाजवळील हरिभाई देवकरण प्रशालेचे मागील गेटजवळून चोरलेली एक मोटार सायकल देखील मिळून आली. सपोनि शैलेश खेडकर व पथकाने नमुद दोन आरोपींकडून, एक मोटार सायकल व दोन मोबाईल असा एकुण ५३,०००/- रुपये किंमतीचा ऐवज जप्त केला व एम.आय.डी.सी पो.स्टे कडे दाखल असलेले मोबाईल चोरीचे दोन गुन्हे व सदर बझार पो.स्टे कडे दाखल असलेला मोटार सायकल चोरीचा एक गुन्हा असे तीन गुन्हे उघडकीस आणले आहेत.

तक्रादार नामे प्रभुलिंग राजेंद्र कदम वय-२५ वर्षे, व्यवसाय : खाजगी नोकरी रा. घर नं. ८०, होटगी रोड, सोलापूर यांची वापरती होंडा शाईन कंपनीची, गुब्बी टाईल्स, औदयोगिक वसाहत, होटगी रोड सोलापूर समोरील पाण्याचे टाकीखाली पार्क केलेली, मोटार सायकल, दि. १३/०१/२०२५ रोजी दुपारी १३:०० वा.ते १६:०० वा.चे दरम्यान, कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली वगैरे फिर्यादीवरुन विजापूर नाका पो.स्टे सोलापूर शहर येथे गुन्हा रजि नं.२१/२०२५ भा.न्या.सं.२०२३ कलम ३०३(२) प्रमाणे मोटार सायकल चोरीचा गुन्हा दाखल होता. सपोनि शैलेश खेडकर व त्यांचे पथकातील अंमलदार यांनी तांत्रीक बाबींची पडताळणी करुन सदर गुन्हयातील मोटार सायकल हस्तगत करुन, मोटार सायकल चोरीचा एक गुन्हा कौशल्याने उघडकीस आणला आहे.

दि. २६/०१/२०२५ रोजी सपोनि शैलेश खेडकर व पथकातील अंमलदार यांना मिळालेल्या बातमीप्रमाणे, रेकॉर्डवरील गुन्हेगार नामे देवराज जगप्पा जिरले वय-२० वर्षे, व्यवसाय :- मजूरी सध्या रा.विले पार्ले, मुंबई मुळ रा. बनकनळी ता. शहापूर जि. गुलबर्गा, कर्नाटक यास त्याचे ताब्यातील दोन मोटार सायकलींसह ताब्यात घेवून तपास केला असता, त्याचेकडून दि. २६/०१/२०२५ रोजी दुपारचे वेळेस सोलापूर येथून चोरलेली मोटार सायकल व काही दिवसांपुर्वी गुलबर्गा येथून चोरलेली एक मोटार सायकल अशा दोन मोटार सायकली हस्तगत करुन (१) सदर बझार पो.स्टे गुन्हा रजि नं. ७४/२०२५ भा.न्या.सं.२०२३ कलम ३०३(२) व (२) चौक पो.स्टे गुलबर्गा गुन्हा रजि नं. ०६/२०२५ भा.न्या.सं.२०२३ कलम ३०३(२) हे दोन मोटार सायकल चोरीचे गुन्हे कौशल्याने उघडकीस आणले आहेत.

सपोनि शैलेश खेडकर व पथकाने माहे जानेवारी २०२५ मध्ये खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

| अ.क्र. | पो.स्टे | गुन्हा रजि नं व कलम | जप्त माल. | किंमत. |
|---|---|---|---|---|
| १ | सदर बझार | ६३/२०२५ भा.न्या.सं.२०२३ कलम ३१८(४), ३०६ | १) ७१.५ ग्रॅम सोन्याच्या एकुण १३ नग पिळयाच्या पी.एन.जी हॉलमार्क असलेल्या अंगठया.<br>२) एक किलो वजनाचा चांदीचा बार. | रु. ५,९२,०००/-<br>रु. ९५,०००/- |
| २ | सदर बझार | ३२/२०२५ भा.न्या.सं.२०२३ कलम ३०३ (२) | १) एक हिरो होंडा कंपनीची पॅशन प्रो मॉडेलची मो.सा. | रु. २०,०००/- |
| ३ | एम.आय.डी.सी. | १९/२०२५ भा.न्या.सं.२०२३ कलम ३०३ (२) | १) एक विवो कंपनीच मोबाईल फोन. | रु. २५,०००/- |
| ४ | एम.आय.डी.सी. | २०/२०२५ भा.न्या.सं.२०२३ कलम ३०३ (२) | १) एक रेडमी कंपनीचा मोबाईल फोन. | रु. ८,०००/- |
| ५ | विजापूर नाका | २१/२०२५ भा.न्या.सं.२०२३ कलम ३०३ (२) | १) एक होंडा शाई न कंपनीची मो.सा. | रु. ५०,०००/- |
| ६ | सदर बझार | ७४/२०२५ भा.न्या.सं.२०२३ कलम ३०३ (२) | १) एक टी.व्ही.एस विगो कंपनीची मो.सा. | रु. २५,०००/- |
| ७ | चौक, गुलबर्गा. | ०६/२०२५ भा.न्या.सं.२०२३ कलम ३०३ (२) | १) एक काळया रंगाची होंडा डिओ कंपनीची मो.सा. | रु. २६,१०१/- |
| जप्त मालमत्ता एकुण किंमत. | | | | रु. ८,४१,१०१/- |

सपोनि शैलेश खेडकर व पथकाने वरील नमुद गुन्हयातील (१) ७१.५ ग्रॅम किंमतीच्या एकुण १३ नग पिळयाच्या अंगळया (२) एक किलो वजनाचा चांदीचा बार, (३) चार मोटार सायकली (२) दोन मोबाईल असा एकुण ८,४१,१०१/- रु. किंमतीचा मुददेमाल हस्तगत करुन, मालमत्तेविषयीचे एकुण ०७ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

सदरची कामगिरी मा. श्री. एम.राजकुमार, पोलीस आयुक्त, सोलापुर शहर, डॉ. दिपाली काळे, पोलीस उपायुक्त, गुन्हे, श्री.राजन माने, सहा.पोलीस आयुक्त गुन्हे तसेच श्री. सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखेकडील नेमणुकीचे स.पो.नि. श्री. शैलेश खेडकर व पथकातील पोलीस अंमलदार संदीप जावळे, विनोद रजपुत, राजकुमार पवार, इम्रान जमादार, उमेश पवार, सिध्दाराम देशमुख, अजय गुंड, सतीश काटे, बाळासाहेब काळे तसेच सायबर पो.स्टे कडील प्रकाश गायकवाड व मच्छिंद्र राठोड यांनी केली आहे.

(डॉ.दिपाली काळे)<br>
पोलीस उप आयुक्त (गुन्हे)<br>
सोलापूर शहर.